मुख्य लेखा व वित्त विभाग
पुणे महानगरपालिका
जावक क्र :- 3637
दिनांक :- 20/12/24

-: कार्यालय परिपत्रक :-

| | |
|---|---|
| विषय | पुणे महानगरपालिका अधिकारी / सेवकांना व सेवानिवृत्ती अधिकारी / कर्मचारी सेवकांना, कुटुंबनिवृत्ती वेतनधारक यांना मे.केंद्र शासनाप्रमाणे सुधारित दराने महागाई भत्ता देणेबाबत. |
| संदर्भ | १) मे.भारत सरकार,वित्त मंत्रालय, व्यय खाते, यांचेकडील कार्यालयीन ज्ञापन क्रमांक ०१/०५/२०२४-E-II (B)नवी दिल्ली दि.२१/१०/२०२४.<br>२) मा.महापालिका आयुक्त ठराव क्र. ६/१०७२,दि.१४/०३/२०२४.<br>३) मा.महापालिका आयुक्त ठराव क्र.६/८२२दि.०६/१२/ २०२४. |

पुणे महानगरपालिका अधिकारी / सेवकांना दिनांक ०१.११.१९७७ पासून मे.केंद्र शासनाचे सेवकांप्रमाणे महागाई भत्ता देण्यास तसेच त्यामध्ये वेळोवेळी होणारे बदल जसेच्या तसे लागू करण्यास मा. महानगरपालिका सभा ठराव क्र. ३७२ दिनांक २३.१२.१९७७ ने धोरणात्मक मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार वेळोवेळी कार्यवाही करण्यात येत आहे.

संदर्भ क्र. २ चे मान्यतेनुसार सद्यस्थितीत दिनांक ०१.०१.२०२४ पासून ५०% दराने महागाई भत्ता अदा करण्यात येत आहे. ७ व्या वेतन आयोगानुसार वेतन घेणाऱ्या अधिकारी / कर्मचाऱ्यांसाठी संदर्भ क्र. १ अन्वये मे. केंद्र शासनाच्या ज्ञापनानुसार महागाई भत्ता दर दिनांक ०१.०७.२०२४ पासून ५०% वरून ३% वाढवून ५३% इतका करण्यात आलेला आहे.

पुणे महानगरपालिकेतील अधिकारी / सेवकांना व सेवानिवृत्ती अधिकारी / कर्मचारी सेवकांना, कुटुंबनिवृत्ती वेतनधारक यांना दिनांक ०१.०७.२०२४ पासून ५०% वरून ३% दराने महागाई भत्ता वाढवून म्हणजेच एकूण ५३% दराने महागाई भत्ता फरकासह अदा करणेस संदर्भ क्र. ३ अन्वये मा.महापालिका आयुक्त यांची खालील बाबीस मान्यता प्राप्त झाली आहे.

१) माहे जुलै २०२४ पासून ७ व्या वेतन आयोगानुसार महागाई भत्ता सुधारित दराने (५०%वरून ५३%) या दराने अदा करणेस.

२) माहे जुलै २०२४ ते माहे नोव्हेंबर २०२४ या पाच महिन्याचे ७ व्या वेतन आयोगानुसार महागाई भत्ता सुधारित ३% दराने (५०% वरून ५३%) फरक माहे डिसेंबर २०२४ पेड इन जानेवारी २०२५ चे वेतनातून अदा करणेस.

३) सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी सेवकांना व कुटुंब निवृत्ती वेतनधारकांना माहे जुलै २०२४ ते माहे डिसेंबर २०२४ या सहा महिन्याचे ७ व्या वेतन आयोगानुसार महागाई भत्ता सुधारित ३% दराने (५०% वरून ५३%) फरक माहे जानेवारी २०२५ पेड इन फेब्रुवारी २०२५ चे निवृत्ती वेतनात अदा करणेस.

वरील मान्यतेनुसार माहे डिसेंबर २०२४ पेड इन जानेवारी २०२५ चे पगार बिलामधून फरकासह रक्कम अदा करताना २४.महागाई भत्ता, या अंदाजपत्रकीय तरतुदीवर खर्च टाकण्यात यावा व दरमहाच्या महागाई भत्त्याचा खर्च खात्याचे वेतन विषयक तरतुदीमधून करण्यात यावा. या कामी सेवापुस्तक व वेतन बिलावर यापूर्वीचे परिपत्रकात विहीत केलेल्या नमुन्यात दाखले ठेवण्यात यावेत.

तरी,विषयांकित कामी मा. महापालिका आयुक्त यांनी दिलेल्या मान्यतेनुसार पुढील जरूर ती तजवीज करणेबाबत सर्व मा. खातेप्रमुख / मा. महापालिका सहाय्यक आयुक्त यांनी आपले नियंत्रणाखालील सर्व संबंधीत सेवकांना जरूर त्या सूचना देऊन याबाबत पूर्तता करावी.

20.12

(उल्का कळसकर)
सह महापालिका आयुक्त तथा
मुख्य लेखा व वित्त अधिकारी
पुणे महानगरपालिका

प्रत :- सर्व मा.खातेप्रमुख,
सर्व मा.महापालिका सहाय्यक आयुक्त
पुणे महानगरपालिका
यांजकडेस माहितीसाठी व पुढील तजविजीसाठी रवाना....